संदर्भ: १] या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एफएलआर. ११९७/४०८३७/५-ब दि. ८. १०. १९९७

२] या कार्यालयाचे सम क्रमांकाचे परिपत्रक दि. २२. १२. १९९७ व २८. १. १९९८.

======

परिपत्रक

क्र. एफएलआर. ११९७/४०८३७/५-ब

मुंबई, ३० मार्च १९९८.

या कार्यालयाच्या उपरोक्त परिपत्रकान्वये राज्यातील सर्व पीएलएल/सीएल-१/बीआरएल तसेच "के" परवानाधारकांनी ते उत्पादन करीत असलेल्या मद्यांच्या बाटल्यांवर दि. १. ४. १९९८ पासून चढत्या क्रमाने क्रमांक छापण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

२. याबाबत निवडक मद्य उत्पादक, लेबल्सवर क्रमांक छापणाऱ्या यंत्र उत्पादकांचे प्रतिनिधी तसेच दि डिस्टीलर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि कॉन्फडरेशन ऑफ इंडियन अल्कोहोल बिव्हरेजीसचे प्रतिनिधी यांची बैठक २१. ३. १९९८ रोजी झाली. सदर बैठकीत ठरल्यानुसार मद्याच्या बाटल्यांच्या लेबल्सवर चढत्या क्रमाने क्रमांक छापण्याची मुदतपुढील आदेश होईपर्यंत पुढे वाढविण्यात येत आहे. मात्र ज्या बिअर व मद्य उत्पादक घटकांकडे अशी यंत्रे अस्तित्वात आहेत त्या सर्व घटकांनी क्रमांक छापण्यास सुरुवात करावी, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. बीअर व्यतिरिक्त अन्य मद्य उत्पादकांनी लेबल ऐवजी बुचांवर व बिअर उत्पादकांनी लेबलवर क्रमांक छापण्यास सुरुवात करावी.

काही मद्य उत्पादक जुन्या बाटल्यांचा वापर मद्य भरण्यासाठी करतात. त्यातील काही बाटल्यांवर इतर मद्य उत्पादक घटकांचे बोधचिन्ह [लोगो] कोरलेले असतात. दुसऱ्या घटकांचा लोगो वापरणे किंवा लोगो असलेल्या बाटल्या वापरण्यामुळे ट्रेड अँड मर्कंडाईज मार्क्स ॲक्ट १९५८चे कलम ७७[२] [बी] चा भंग होतो. व त्यासाठी सदर कायद्याच्या कलम ७८ खाली ३ वर्षे पर्यंत तुरुंगवास व/किंवा दंड अशी शिक्षा होऊ शकते. सभेतील चर्चेअंती ठरल्याप्रमाणे यापुढे मद्य उत्पादकांनी दुसऱ्या मद्य उत्पादकांच्या बोधचिन्ह [लोगो] असणाऱ्या जुन्या रिकाम्या बाटल्यांचा वापर करू नये. याबाबत घटकांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येत आहेत.

काही मद्य उत्पादकांनी मद्याच्या बाटल्यांच्या बुचावर क्रमांक छापण्याऐवजी त्यांच्या कंपनीचे बोधचिन्ह [लोगो] सदर यंत्राद्वारे छापण्याचे मान्य केले आहे. ग्राहकांच्या जागृतीसाठी मद्य उत्पादकांनी त्यांच्या कंपनीचे असली मद्य ओळखण्यासाठी बुचांवर बोधचिन्ह [लोगो] छापण्यात आले आहे याची माहिती मोनोकार्टनवर छापावी किंवा एफ. एल१/एफ. एल. २ अनुज्ञप्तीधारकांमार्फत ग्राहकांच्या निदर्शनास येईल अशी व्यवस्था केल्यास नकली मद्य ओळखण्यास उपयुक्त होईल.

[श्री तरुणार जैन]
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

प्रति

१. सर्व पीएलएल/सीएल-१/बीआरएल अनुज्ञप्तीधारक.
२. "के" फॉर्म अनुज्ञप्तीधारक.
३. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
४. सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क. ५. सर्व कार्यालय अधिकारी. ६] अभिलेख शाखा